क्र.साप्रवि/रवका/न.क्र.५/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

## प्रशासकीय परिपत्रक क्र. ७१ दिनांक ०१/०९/२००६

विषय : परदेश दौ-यासंबंधीचे निकष.

संदर्भ : १) कक्ष अधिकारी, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग यांचे पत्र क्र.आयएलई-१००६/८३५/ प्रशासन-३ दि.३०.६.२००६
२) शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्र.सीडीआर-१००६/प्र.क.९/०६/११ दिनांक १५.६.२००६.

......

कक्ष अधिकारी,उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या संदर्भिय पत्रासोबत प्राप्त झालेले सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्र.सीडीआर-१००६/प्र.क.९/०६/११ दि.१५.६.२००६ ची प्रत पाठविली आहे.

२. सदर शासन परिपत्रकात पदाधिका-यांच्या परदेश दौ-यासंबंधी महाराष्ट्र शासनाकडून स्पष्ट व सविस्तर असे निकष लागू करण्यात आले आहेत.

३. सर्व संबंधित अधिका-यांना विनंती करण्यात येते की उपरोक्त शासन परिपत्रकातील सूचनांचे काटेकोरपणे अवलोकन करुन तंतोतंत पालन करावे.

४. सदर शासन परिपत्रक दि.१५.६.२००६ ची प्रत माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव सोबत जोडली आहे.

सोबत : वरीलप्रमाणे.

*( सु. य. पाटील )*
*मुख्य महाव्यवस्थापक (क)*

प्रति,

कार्यकारी अभियंता तत्सम व त्यावरील दर्जाच्या सर्व अधिका-यांना महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीनुसार

*K/Adm.Cir.F.N.5*

**अखिल भारतीय सेवेतील, राज्य सेवेतील तसेच सार्वजनिक उपक्रम, मंडळे, महामंडळे इत्यादींचे पदाधिकारी यांच्या परदेश दौऱ्यांसंबंधीचे निकष**

महावितरण मुंबई
सामवि ८ र.व.का.
~~आवक/जावक~~
नंबर: ३८
दिनांक: २/११.०

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग
परिपत्रक क्र.सीडीआर-१००६/प्र.क.९/०६/११,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- १५ जून, २००६.

वाचा :- १) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीडीआर-१०९६/८७/ प्र.क्र.४/९६/११, दि.६.०४.९६

२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीडीआर-१०९६/८७/ प्र.क्र.४/९६/११, दि.३१.१२.९६

३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीडीआर-१०९६/८७/ प्र.क्र.४/९६/११, दि.११.०४.९७

## परिपत्रक

अखिल भारतीय सेवेतील, राज्य सेवेतील तसेच सार्वजनिक उपक्रम, मंडळे, महामंडळे इत्यादींचे पदाधिकारी यांच्या परदेश दौऱ्यांच्या संदर्भातील प्रस्ताव संदर्भाधीन परिपत्रकांतील सूचनांनुसार शासनाची मान्यता घेण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील छाननी समितीमार्फत सादर करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाकडे प्राप्त होतात. सदरहू प्रस्तावांची तपासणी केली असता, अशा परदेश दौऱ्यांसाठी अधिकाऱ्यांची अनुरुप पात्रता, परदेश दौऱ्यामुळे राज्याला होणारा फायदा, शासकीय अधिकाऱ्यांवर आदरातिथ्य (Hospitality) स्वीकारण्याबाबतची बंधने याबाबतचे कोणतेही निकष विचारात न घेता, संबंधित विभागातर्फे प्रस्ताव मान्यतेसाठी सादर केले जातात असे दिसून आले आहे. तसेच, बऱ्याचदा संबंधित अधिकारी राष्ट्रीय/ आंतरराष्ट्रीय तसेच शासकीय/अशासकीय संस्थांकडून त्यांना अशा परदेश दौऱ्यावर आमंत्रित केल्याचे त्यांचे वैयक्तिक नावाचे निमंत्रणपत्र स्वतः प्राप्त करुन घेतात व शासनाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केला जातो.

वस्तुतः परदेश दौऱ्याबाबत केंद्र शासनाच्या मंत्रिमंडळ सचिवालयाने तसेच, आर्थिक व्यवहार विभागाने याबाबत स्पष्ट व सविस्तर असे निकष निश्चित केलेले आहेत. यामध्ये शासकीय अधिकारी, मा.मंत्री/राज्यमंत्री, मा.आमदार, मा.खासदार यांच्या दौऱ्याबाबत प्रस्ताव तपासणीचे व मंजुरी देण्याचे निकष समाविष्ट आहेत. यानुसार राज्य शासनाची मान्यता परदेश दौऱ्याला प्राप्त झाली तरी केंद्र शासनाच्या निकषानुसार आवश्यक ती स्वतंत्र परवानगी घेणे बंधनकारक असतेच.

उपरोक्त बाबी विचारात घेऊन यापुढे सर्व प्रशासनिक विभागांनी परदेश दौऱ्याचे प्रस्ताव मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील छाननी समितीसमोर सादर करण्यापूर्वी खालील निकषानुसार तपासणी करणे आवश्यक आहे:-

१) **(अ)** कोणत्याही अधिकाऱ्याला जर राष्ट्रीय/ आंतरराष्ट्रीय **संस्था अथवा संघटनेकडून** (सार्वजनिक अथवा खाजगी ) परस्पर त्यांच्या **नावाने परदेश** दौऱ्यासाठी निमंत्रण प्राप्त झाले असेल तर **अशा निमंत्रणावरुन संबंधित विभागाने प्रस्ताव छाननी समितीसमोर सादर करु नये. अशा प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही.**

**(ब)** राज्य शासनाच्या कोणत्याही विकास योजनेच्या अथवा इतर कामकाजाच्या संदर्भात संबंधित राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय संस्था किंवा संघटना राज्यातील अधिकाऱ्यांना आमंत्रित करु इच्छित असेल तर कोणत्या संबंधित अधिकाऱ्यांना या निमित्ताने Depute केले पाहिजे याबाबतचा निर्णय राज्य शासन घेईल. **त्यामुळे अशा संस्था/ संघटनांकडून राज्य**

शासनास (जरी) विशिष्ट अधिका-यांच्या वैयक्तिक नावांने प्रस्ताव प्राप्त झाला तरी त्या अधिका-याऐवजी इतर सुक्षम अधिका-याचा विचार छाननी समिती करु शकेल व त्यानुसार शासनाला मान्यतेसाठी शिफारस करु शकेल. त्यामुळे कोणत्याही अधिका-यांनी प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे स्वत:ची परदेश दौ-यासाठी शिफारस करुन घेण्याचा प्रयत्न करु नये. असे निदर्शनास आल्यास त्या अधिका-यांची शिफारस तर केली जाणार नाहीच, परंतु शिस्त व अपील नियमानुसार त्यांचे विरुध्द कार्यवाही करण्याचा सुध्दा शासन विचार करेल.

२. अधिका-यांनी खाजगी परदेश दौरा केल्यास त्यांना राज्य शासनाच्या मान्यतेची आवश्यकता नसली तरी शासन सेवेत असेपर्यन्त असा दौरा करताना त्यांनी कोणत्याही खाजगी / वाणिज्यीक संस्था यांच्या आमंत्रणावरुन तो दौरा करु नये व अशा कोणत्याही संस्थांकडून आदरातिथ्य,प्रवास खर्च अथवा परदेशात वास्तव्याचा खर्च स्वीकारु नये.

३. छाननी समिती शासनास अधिकृतरित्या प्राप्त झालेल्या खालील प्रकारच्या परदेश दौ-यासाठीच्या प्रस्तावांना, दौ-याचे प्रयोजन राज्याच्या प्रगती व विकासाच्या दृष्टीने आवश्यक आहे याची शहानिशा करुन मान्यता देण्याची शिफारस करु शकेल :-

(अ) अभ्यास दौरा,

(ब) आंतरराष्ट्रीय कार्यशाळा,

(क) राज्याच्या हिताच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय संस्थाना व्यावसायिक व तांत्रिक ज्ञानवर्धनासाठी भेट,

(ड) आंतरराष्ट्रीय संस्थांशी राज्य शासनाच्या वतीने द्विपक्षीय आर्थिक, वाणिज्यीक,औद्योगिक स्वरुपाचे करार करण्यासाठी करावयाचा परदेश दौरा (अर्थात या दौ-यांना केंद्र शासनाची स्वतंत्रपणे परवानगीची आवश्यकता राहील.)

(इ) नियमित देवाण-घेवाण (Exchange Programme) कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाच्या मान्यतेनुसार अधिका-यांनी करावयाचे परदेश दौरे.

(फ) इतर देशाच्या शासनाकडून अथवा युनायटेड नेशन्स ऑरगनायझेशनच्या (UNO) स्पेशल एजन्सीजकडून किंवा मान्यता प्राप्त संस्थाकडून अथवा प्रादेशिक आर्थिक गटाकडून (Regional Group) किंवा केंद्र शासनाने मान्य केलेल्या अशा त-हेच्या इतर आंतरराष्ट्रीय संस्थांकडून उद्योग, वाणिज्यीक,शैक्षणिक, सांस्कृतिक बाबींसाठी अधिकृत निमंत्रण राज्य शासनाला प्राप्त झाले असल्यास व त्यानुसार राज्य शासनाने संबंधित अधिका-यांना संबंधित देशात पाठवावयाच्या शिष्टमंडळात समावेश केला असल्यास.

(ग) द्विपक्षीय करारांतर्गत मान्य प्रशिक्षणे.

४. (एक) कोणत्याही अधिका-याला एका वर्षात वर नमूद केलेल्या ३ प्रकारतील जास्तीत जास्त दोन परदेश दौरे करण्याची परवानगी देता येईल.

(दोन) वरील ३ (ग) वगळून कोणताही परदेश दौरा हा प्रवासाची वेळ धरुन कमाल १५ दिवसांच्यावर असणार नाही.

(तीन) शासनाने नियुक्ती केल्यास परदेश दौ-याला जोडून सुट्टी घेवून परदेशात वास्तव्य प्रचलित नियमानुसार जो कमाल कालावधी अनुज्ञेय आहे त्या कालावधीकरिता करता येईल.

(चार) प्रस्तावित दौरा राज्य शासनाच्या खर्चाने असल्यास समिती सर्वसाधारणपणे शिफारस करणार नाही. अपवादात्मक परिस्थितीत, राज्य शासनास दौ-यामुळे होणारा परोक्ष फायदा हा निकष लावून वित्त विभागाच्या सहमतीने शिफारस करण्यात येईल.

५.	छाननी समितीसमोर प्रस्ताव सादरीकरणाचे वरील निकष हे केंद्र शासनाने व राज्य शासनाने या शिवाय जे इतर निकष वेळोवेळी निश्चित केले असतील त्याशिवाय आहेत.

६. वरील निकष हे परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अमलात येतील.

७.	यापुढे सर्व प्रशासकीय विभागांनी अखिल भारतीय सेवेतील, राज्य सेवेतील तसेच सार्वजनिक उपक्रम, मंडळे, महामंडळे इत्यादींचे पदाधिकारी यांच्या परदेश दौऱ्यांचे प्रस्ताव सादर करताना वरील निकषात बसत असल्यासच छाननी समितीस सादर करावा. अन्यथा त्याचा विचार करण्यात येणार नाही. निकषात न बसणारे प्रस्ताव सादर केल्यास छाननी समिती याची गंभीर दखल घेईल.

८.	सर्व मंत्रालयीन विभागांनी वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. तसेच, सदरहू सूचना त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सार्वजनिक क्षेत्रातील सर्व उपक्रम, मंडळे व महामंडळे, सांविधिक तसेच शासकीय व निमशासकीय संस्था यांच्या निदर्शनास आणून देऊन या सूचनांचे त्यांच्याकडून काटेकोरपणे पालन केले जाईल याबाबत दक्षता घेण्याच्या सूचना देखील त्यांना द्याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( भि. रा. वाळवे )

उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
मुख्य सचिव
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक,
* प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ न्याय शाखा), मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई,
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधानसभा सचिवालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधानपरिषद सचिवालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
सर्व मंत्रालयीन विभाग,
निवड नस्ती,

---------------

* पत्राने